# जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा यांचे कार्यालय

## निविदा सूचना

क्रमांक/संगणक: २४३२ /२०२५ दिनांकः ०५ /०७/२०२५

माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांचे दिनांक ०५/०७/२०२५ चे आदेशानुसार जिल्हा न्यायालय, भंडारा व अधिनस्थ/तालूका न्यायालय येथील किऑस्क व यू.पी.एस. यांचेकरिता गैरव्यापक वार्षिक देखभाल दुरूस्ती करार (Non-Comprehensive Annual Maintenance Contract) करण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहेत. ईच्छूक कंपनी/अभियंता यांनी त्यांची कमीत कमी दराची सिलबंद (मोहोरबंद) निविदा दिनांक १५/०७/२०२५ ला सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत जिल्हा न्यायालय, भंडारा येथे सादर करावी.

त्यानंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

## प्रपत्र क्रमांक १

| Sr. No. | Hardware Name | Make and Model | Quantity | Peripheral parts | Rate Per Unit/ Per Nos. with Installation (Including GST.) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Information KIOSK (Dell E2218 HN Touch Screen:PC AP 22") | Infinitas i-300 Pedestal Model Construction Base: Bajaj Steel or Tata Steel CRCA 1.6 mm Processor:i-3-7100 RAM-4GB, 500 GB HDD, HDMI UPS:(Circle) Power YPB 600VA AC Adopter: M inter: 12V-1A USB: 2X2.0, 2X3, 0 Speaker : Two | 09 | Dell Touch Screen: 22 Inch | |
| | | | | Processor: i3 | |
| | | | | Motherboard L115 | |
| | | | | RAM- 4GB, DDR4 | |
| | | | | 500 GB HDD, | |
| | | | | Switched-Mode Power Supply (SMPS) | |
| | | | | UPS:12v DC, 7ah, 600VA | |
| | | | | Servicing Charges | |
| 2. | Uninterru-ptible Power Supply (U.P. S.) 2 KVA | RS Power Systems (P) Ltd, Power Plus 2KVA Online | 08 | Battery 12V 75 AH,12AL075 | |
| | | | | Battery 12V 42 AH,12AL075 | |
| | | | | Inverter Circuit Board | |
| | | | | Cooling Fan | |
| | | | | LCD/LED Display Panel | |
| | | | | UPS Compatible Battery Cable | |
| | | | | Servicing Charges | |

## गैरव्यापाक वार्षिक देखभाल/दुरूस्तीबाबत अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १. | सदर करार जिल्हा न्यायालय, भंडारा व अधिनस्थ तुमसर, मोहाडी, पवनी, साकोली, लाखणी व लाखांदूर या तालूका न्यायालयातील उपरोक्त नमूद किऑस्क व यू.पी.एस. करिता राहील. उपरोक्त नमूद किऑस्क किंवा यू.पी.एस मध्ये बिघाड आल्यास ते दुरूस्तीकरिता संबंधित कंपनी/अभियंता यांना संबंधित न्यायालयात स्वतः जावून सदरचे किऑस्क किंवा यू.पी.एस दुरूस्ती करावा लागेल. |
| २. | सदर करार गैरव्यापक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करार (Non-Comprehensive Annual Maintenance Contract) पध्दतीचा राहील. निविदा सूचनेमध्ये नमूद किऑस्क किंवा यू.पी.एस दुरूस्ती करिता त्याच्याशी संबंधित सुटे भाग खरेदी करून नवीन लावावयाचे असल्यास प्रपत्र क्रमांक १ मधील यादीनुसार खरेदी करण्यात येतील. खरेदी करण्यात आलेले सुटे भाग उच्च दर्जाचे असणे बंधनकारक राहील. |
| ३. | करार झाल्यावर कंपनी/निविदाधारकास तक्रार दाखल करण्याकरिता एक ई-मेल आयडी व एक मोबाईल/दूरध्वनी क्रमांक देणे बंधनकारक राहील. ज्यावर जिल्हा न्यायालय, भंडारा व तालूका न्यायालयातील संबंधित कर्मचारी यांचेद्वारे तक्रार नोंदविले जातील. सदरचा करार गैरव्यापक वार्षिक देखभाल व दुरूस्ती पध्दतीचा असल्याने एखाद्या किऑस्क किंवा यू.पी.एस. मध्ये बिघाड आल्यास प्रपत्र क्रमांक १ मधील यादीनुसार ते दुरूस्ती केले जातील. दुरूस्तीकरिता लावण्यात आलेले आवश्यक सुटे भाग सर्व्हीस रिपोर्ट मध्ये स्पष्ट नमूद करणे बंधनकारक राहील व त्यावर संबंधित न्यायालयातील डी.एस.ए./सह. डी.एस.ए/सिस्टीम ऑफिसर/टी.एस.ए किंवा संबंधित कर्मचारी यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक राहील. |
| ४. | निविदा सादर करणारे कंपनी/अभियंता यांनी निविदा सादर करतेवेळी निविदेतील प्रपत्र क्रमांक १ तसेच अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचावे तद्नंतर त्यांची कमीत कमी दराची निविदा सिलबंद लिफाफ्यामध्ये सादर करावी. निविदेमध्ये नमूद करण्यात आलेले दर सर्व कर आणि इतर शुल्कासहित आहेत असे गृहीत धरण्यात येईल. |
| ५. | कंपनी रूपये ५०,०००/- अक्षरी रूपये पन्नास हजार फक्त किंमतीपेक्षा जास्त च्या वार्षिक देखभाल करार व्यापारात कमीत कमी ०१ वर्षापेक्षा जास्त काळ अस्तित्वात असायला हवी. तसेच कंपनी/अभियंता यांचेकडे संगणकीय उपकरणे दुरूस्ती/देखभाल चे कौशल्य/अनुभव असणे आवश्यक आहे. |
| ६. | निविदा सादर करताना त्यासह कंपनीचा नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, आधारकार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, आयकर प्रमाणपत्र (मागील ०१ वर्षाचे), नजीकच्या काळात शासकीय/निमशासकीय कार्यालयात संगणकीय हार्डवेअर संबंधित करार केलेल्या वार्षिक देखभाल/दुरूस्ती (कमीत कमी ०१) इत्यादी कागदपत्रांच्या स्वयंःप्रमाणित छायाप्रत सादर करणे बंधनकारक राहील. |
| ७. | हार्डवेअर दुरूस्तीकरिता ई-मेल किंवा मोबाईल/दूरध्वनी संदेशाद्वारे तक्रार दाखल केली असता कंपनी/निविदाधारक यांना जिल्हा न्यायालय, भंडारा येथील तक्रार ०३ दिवसाचे आत व तालूका न्यायालयातील तक्रार ०५ दिवसाचे आत दुरूस्ती करून द्यावी लागेल. असामान्य परिस्थितीत प्रपत्र क्रमांक १ मधील कोणतेही हार्डवेअर दुरूस्ती होत नसल्यास किंवा त्याचे सुटे भाग उपलब्ध होत नसल्यास त्याचे वैध कारण सेवा रिपोर्ट (Service Report) मध्ये नमूद करणे बंधनकारक राहील. वैध कारण लक्षात घेऊन अशा दुरूस्तीकरिता जास्तीत जास्त एक आठवडा ईतका कालावधी देण्यात येईल. त्यानंतरही हार्डवेअर दिलेल्या वेळेत दुरूस्ती करून न दिल्यास न्यायालय स्थानिक बाजारातून हार्डवेअर दुरुस्ती करेल. |
| ८. | निविदा मंजूर झालेल्या कंपनीला रूपये ५००/- च्या बॉन्ड पेपरवर आपला करार लिहून द्यावा लागेल व सदरहू बॉन्ड पेपर करिता आलेला खर्च कंपनीला सोसावा लागेल. तसेच अनामत रक्कम म्हणून एकूण रूपये १०,०००/- अक्षरी रूपये दहा हजार फक्त या कार्यालयास जमा करणे बंधनकारक राहील. करार संपल्यानंतर सदरची अनामत रक्कम कंपनी/निविदाधारकास परत करण्यात येईल. |
| ९. | कोणत्याही परिस्थितीत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. देयक हे द्विप्रतीत संपूर्ण तपशिलासह या कार्यालयास सादर करावे लागेल. देयक हे त्रैमासिक पध्दतीने त्रैमासिक संपल्यानंतर सादर केल्यावर नियमानूसार अदा करण्यात येईल. नियमांनुसार लागू होणारे कर/शुल्क/दंड कपात करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| १०. | कंपनी/अभियंता ०१ वर्षाचा वार्षिक देखभाल व दुरूस्ती करार पूर्ण झाल्यानंतर त्याच दर, अटी आणि शर्तींनुसार वार्षिक देखभाल–दुरूस्ती कराराचा कालावधी वाढविण्यास इच्छूक आहे किंवा नाही हे सूचित करू शकतो. |
| ११. | सदर निविदा सूचनेमध्ये प्रपत्र क्रमांक १ मध्ये नमूद हार्डवेअर कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी अथवा संपूर्णतः वगळण्याचे अधिकार किंवा त्यामध्ये इतर हार्डवेअर समाविष्ट करण्याचा अधिकार माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. |
| १२. | कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. |
| १३. | सदर करार हा मंजूर झाल्याचा दिनांकापासून ते पूढील एक वर्षाकरिता वैध राहील. परंतु कार्यालयास वाटल्यास तो कोणत्याही क्षणी, कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. |

**टिपः** १. निविदा सादर करतांना लिफाफ्याच्या पृष्ठभागावर **किऑस्क व यू.पी.एस चा गैरव्यापक वार्षिक देखभाल व दुरूस्ती बाबत निविदा’** असा स्पष्ट उल्लेख करावा.

२. निविदा उपरोक्त दिलेल्या नमून्यातच सादर करावे, त्यात कोणताही बदल करू नये.

३. निविदा सादर करतांना अटी व शर्ती क्रमांक ६ मधील आवश्यक कागदपत्रे सादर करावे.

४. निविदा सादर करतांना निविदा सूचनेमधील अटी व शर्ती क्रमांक १ ते १३ मान्य असल्याचे नमूद करावे.

आदेशान्वये,

05/7/25

(एस. एम. निनावे)
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, भंडारा